स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शोध आराखडा

✠ संशोधनाचा विषय ✠

नांदेड जिल्ह्याच्या विकासात कृषी प्रक्रीया उद्योगांची भूमिका
विशेष संदर्भ : दालमील व तेलगिरणी उद्योग

✠ शिक्षणक्रम ✠

पीएच.डी. वाणिज्य शाखा

✠ **संशोधक** ✠

शंकर खुशालराव चमकुरे

(एम.कॉम.एम.फील., जी.डी.सी.ॲड ए.)

✠ **मार्गदर्शक** ✠

डॉ. पी.टी. पवार

(एम.कॉम., एम.फील., पीएच.डी.)

वाणिज्य विभाग

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर

जि. लातूर

✠ **अभ्यास केंद्र** ✠

दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

प्रस्तावना (Introduction) :-

भारतीय उद्योगधंद्यापैकी दालमील उद्योग हे मोठ्या प्रमाणातील कृषी प्रक्रीया उद्योगापैकी एक भाग आहे. दालमील उद्योगाचे वार्षीक उत्पादन 13.19 दशलक्ष टन एवढे होते. दालमील उद्योगाचा भरतामध्ये मोठ्या प्रमाणात विकास होत आहे तसेच त्यांची वाढही होत आहे. इ.स. 1972 मध्ये भारतात एकूण 2000 दालमील उद्योग होते. तसेच इ.स. 2000 मध्ये यामध्ये वाढ होऊन 14000 दालमील उद्योग स्थापित झाले आहेत. यापैकी 3000 दालमील महाराष्ट्रात आहेत, त्यापैकी जळगाव, औरंगाबाद, अकोला, नागपूर, लातूर व नांदेड या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात दालमील आहेत. महाराष्ट्रात 18000 टन प्रति दिवस एवढे दाळीचे उत्पादन होते. भारतामध्ये एकूण 125 दालमील असोसिएशन्स आहेत. त्यापैकी 65 महाराष्ट्रात आहेत. अशी माहिती नागपूरचे दालमील असोसिएशन मेंबर श्री मनोहर भोजवानी यांनी दिली आहे.

मराठवाडा विभागात एकूण आठ जिल्ह्याचा समावेश असून ते औरंगाबाद, जालना, बीड, परभणी उस्मानाबाद, लातूर, हिंगोली व नांदेड असे आहेत. या 8 जिल्ह्यामध्ये औरंगाबाद, लातूर व नांदेड हे तीन जिल्हे औद्योगिक, आर्थीक व शैक्षणिकदृष्ट्या इतर जिल्ह्याच्या तूलनेत अधिक विकसित असून इतर 5 जिल्हे तुलनेने मागासलेले आहेत. अशा या विकसीत जिल्ह्यापैकी नांदेड हा जिल्हा औद्योगिकदृष्ट्या विकसीत असल्यामुळे संशोधन अभ्यासाठी या जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. नांदेड जिल्ह्यात विविध उद्योग आहेत त्यापैकी मुख्यत्वेकरून साखर कारखाने, तेलगिरणी, दालमील, फळप्रक्रिया उद्योग, औषधे, रासायनिक खते, स्टील उद्योग, सुतगिरणी, कापड निर्मीती, दुग्ध व्यवसाय इ. व्यवसाय उद्योग चालतात. त्यापैकी कृषी प्रक्रीया उद्योगाच्या अभ्यासासाठी दालमील, तेलगिरणी व फळप्रक्रीया उद्योगांचा अभ्यास या संशोधनासाठी घेण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 33,61292 इतकी होती व 2001 च्या जनगणनेनुसार ही लोकसंख्या 28,76259 इतकी होती.

जिल्ह्याला शैक्षणिक, सांस्कृतीक वारसा लाभलेला आहे. येथे अनेक शैक्षणिक संस्था व प्राचीन मंदिरे आहेत. नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण सोळा तालुके आहेत ते सोळा तालुके असे आहेत. 1. नांदेड 2. हिमायतनगर 3. भोकर 4. धर्माबाद 5. अर्धापूर 6. माहुर 7. उमरी 8. नायगाव 9. हदगाव 10. किनवट 11. मुदखेड 12. बिलोली 13. देगलूर 14. मुखेड 15. कंधार 16. लोहा या सर्व तालुक्यांचे जिल्ह्याच्या विकासासाठी आपापल्या पध्दतीने योगदान आहे. नांदेड जिल्ह्यात विविध तालुक्यात एकूण 55 ऑईलमील, 27 दालमील व लिंबगाव येथे 1 फळप्रक्रीया उद्योग आहेत. हे सर्वच उद्योग जिल्हा उद्योग केंद्राकडे नोंदणीकृत आहेत. हे उद्योग लघुउद्योग (SSI) या प्रकारात येतात.

नांदेड जिल्ह्यात एकूण तेलगिरणी उद्योग पुढीलप्रमाणे आहेत.
नांदेड - 25, नायगाव -02, किनवट - 02, मुखेड - 02, कंधार - 05, लोहा - 05, देगलूर - 08, बिलोली -03, धर्माबाद - 03, या सर्वांमध्ये सुर्यफूल, करडी, आंबाडी व शेंगदाणा तेलाचा समावेश आहे. जिल्ह्यातील दालमील उद्योग पूढील प्रमाणे आहेत. नांदेड - 17, धर्माबाद - 01, लोहा - 01, देगलूर - 04, नायगाव - 02, मुखेड -02, या सर्व उद्योगात तूर, चना, उडीद, मुग अशा दाळींचा समावेश आहे. जिल्ह्यातील एकूण तेलगिरणी पैकी परंपरागत पध्दतीने चालणारे 48% तर नवीन स्थापन झालेले 52% आहेत. तसेच दालमीलपैकी 80% परंपरागत उद्योग आहेत तर 20% नवीन उद्योग आहेत.

कृषी प्रक्रीया उद्योगासाठी विविध आर्थीक योजना केंद्र व राज्यशासनाने पुढे आणलेल्या ओत. सर्वच राष्ट्रीयकृत बँकामार्फत तसेच जिल्हा उद्योग केंद्र आणि खादीग्रामोद्योग मंडळ यांच्यातर्फे अर्थसहाय्य करण्यात येते काही शासकीय योजनेद्वारे या उद्योगांना अनुदान देण्यात येते.

इ.स. 2005 पासून राष्ट्रीय फलोउत्पादन अभियानामार्फत कृषी मालावर प्रक्रीया करणारे उद्योग स्थापन्यासाठी नांदेड जिल्ह्यामध्ये बेरोजगारांना रोजगार उपलब्ध

झाला आहे. मालाचे उत्पादन यांत्रिकीकरणामुळे कमी वेळात मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे शक्य झाले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील जनतेचे उत्पन्न वाढावे व त्यांच्या आर्थीक अडचणी दूर होवून त्यांना मध्यमवर्गीयांचे चांगले जीवन जगता यावे यासाठी अशा कृषी प्रक्रीया उद्योगामार्फत चांगला वाटा उचलण्यात आलेला आहे. त्यामुळे अशा उद्योगांच्या समस्या शोधून त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी उपाय सुचविणे गरजेचे असल्याने संशोधनाचा विषय नांदेड जिल्ह्यातील कृषी प्रक्रीया उद्योंगाचा विश्लेषणात्मक अभ्यास हा निवडण्यात आला आहे.

❁ साहित्याचे अवलोकन (Review of Literature) :-

कृषी प्रक्रीया उद्योगांचा अभ्यास करीत असताना काही पुस्तके, नियतकालिके यांचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

01. कानवाडे व्ही. आर. 1987, "प्रोसेसिंग ऑफ ऑइल सिड्स," पेपर प्रेझेंटेशन ॲट पुणे.

02. डॉ. जोशी, डॉ. पळणीटकर इ.स. 2005, "विपणन,जाहिरात व विक्रयकला," पिंपळापूरे ॲड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

    कृषी प्रक्रीया उद्योगातील उत्पादनातील आवश्यक कच्चा पक्या मालाची बाजारपेठ कशी शोधायची व उत्पादीत मालाची साठवणूक कशा प्रकारे करण्यात आली पाहिजे. तसेच यासाठी करण्यात येणाऱ्या विविध जाहिराती कशा तयार करायच्या या बाबत चांगले मार्गदर्शन या संदर्भ ग्रंथातून लाभले आहे.

03. डॉ. एम. ए. लोखंडे, प्रा. एल. बीकृबहीर. 2007, "परीव्यय लेखांकन," कैलास प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद.

04. डॉ.वर्षा ऐनापुरे 2014, "ॲडव्हांस कॉस्ट अकाऊंटींग," मनान प्रकाशन, मुंबई.

05. प्रा.चोपडे, प्रा.चौधरी 2015, "ॲडव्हांस कॉस्ट अकाऊंटींग," सेठ प्रकाशन, मुंबई.

    सदरील ग्रंथाचा अभ्यास कृषी प्रक्रीया उद्योगामध्ये देण्यात येणाऱ्या कामगारांना मजुरी बाबत करण्यात आलेला आहे.

06. डॉ.श्री बी.कडवेकर, प्रा.रविंद्र कोठावरे इ.स. 2006, "व्यावसायीक उद्योजगता," डायमंड पब्लिकेशन, पुणे 30.

वरिल ग्रंथातून लघु उद्योग व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्याच सोबतच महाराष्ट्र राज्याच्या स्वयंरोजगार योजनेच्या अभ्यासासाठी देखिल उपयोग करण्यात आलेला आहे.

❁ संशोधन विषयाचे उद्देश (Objectives of Research) :-

पुढिल प्रमाणे व्यक्त केलेले आहेत :-

01. नांदेड जिल्ह्यातील रोजगार निर्मितीतील योगदानाचा अभ्यास करणे.
02. उद्योगातील आधुनिक यांत्रिकीकरणाचा अभ्यास करणे.
03. उद्योगांना कोणत्या बाजारपेठा उपलब्ध आहेत यांचा शोध घेणे.
04. उद्योगाशी संबंधीत शेतकरी, कामगार, उद्योजक, वितरक, विक्रेते इत्यादी घटकांच्या उत्पन्नातील वाढीचा अभ्यास करणे.
05. नांदेड जिल्ह्याच्या विकासातील कृषी प्रक्रीया उद्योगांची भूमिका अभ्यासणे.

❁ संशोधन अभ्यासाची गृहितके (Hypothesis) :-

संशोधकाने संशोधन करीत असतांना काही गृहितांचा आधार घेतलेला आहे.

01. दालमिल व तेलगिरणी उद्योगातील रोजगारांच्या उत्पन्नत वाढ होते.
02. कृषी प्रक्रीया उद्योगामुळे जिल्हयाच्या आर्थीक विकासात भर पडते.
03. कृषी प्रक्रीया उद्योगामुळे कृषी उत्पादन प्रगतीत चालना मिळते.

❁ संशोधन पध्दती (Research Methodology) :-

नांदेड जिल्ह्यातील कृषी प्रक्रीया उद्योगांचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यासाठी पुढील संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

01. प्राथमिक माहिती (Primary Data) :-

सर्वेक्षण, मुलाखतील, प्रश्नावली, नमुना पध्दती हे शहर व नांदेड जिल्ह्याअंतर्गत इतर सर्व तालुक्यातून करण्यात येईल.

02. दुय्यम सामुग्री (Secondary Data) :-

वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासीके, जिल्हाउद्योग केंद्र कार्यालय यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारावर सदरील संशोधनासाठी माहितीचे संकलन केले जाईल.

❁ संशोधन अभ्यासाचे महत्व (Importance of Research Study) :-

संशोधन अभ्यास विषयाचे महत्व संशोधकाने पुढील प्रमाणे वर्णन केलेले आहे.

01. कृषी प्रक्रीया उद्योगाची उत्पादकता वाढविण्यासाठी
02. उद्योगांना लागणारा कच्चा माल योग्यप्रमाणात पुरवठा करण्यासाठी
03. वाढत्या लोकसंख्येच्या उदरनिर्वाहासाठी
04. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज करण्यासाठी
05. बेरोजगारांना स्वावलंबी करण्यासाठी

❁ संशोधन विषयाच्या मर्यादा (Limitation of research study) :-

संशोधकाने संशोधन करीत असतांना काही मर्यादा ठेवलेल्या आहेत.

01. संशोधन अभ्यास केवळ 10 आर्थीक वर्षाच्या कालावधी करीता मर्यादीत आहे.
02. वेळेच्या व आर्थिक अडचणीमुळे हा अभ्यास केवळ नांदेड जिल्ह्यातील कृषी प्रक्रीया उद्योगांपुरताच मर्यादीत आहे.
03. संशोधन अभ्यास हा दालमील, तेलगिरण्या, फळप्रक्रिया उद्योग यावर आधारीत आहे.
04. संबंधीत अभ्यास प्राथमिक माहिती व दुय्यम माहितीच्या अधारावर करण्यात येईल.

❁ सांख्यिकीय तंत्रे (Statistical Tools) :-

संशोधनासाठी सहसंबंध (Correlation), निर्देशांक (Index No.) सरासरी, शेकडेवारी, अशा सांख्यिकीय तंत्रांचा उपयोग केला जाईल. तसेच आर्थीक अभ्यासासाठी चा वापर केला जाईल.

संबंधित अभ्यासासाठी विविध कृषी प्रक्रीया उद्योगांपैकी तेलगिरणी, दालमील आणि फळप्रक्रीया उद्योग यांची निवड करण्यात आलेली आहे. नांदेड जिल्ह्यातील एकूण तेलगिरणी उद्योग, दालमील आणि फळप्रक्रीया उद्योग यापैकी प्रत्येक केवळ 20 नमुना, संशोधन अभ्यासासाठी घेण्यात आलेला आहे.

❁ अपेक्षीत सहभाग (Expected Contribution) :-

संशोधकाने केलेल्या संशोधनाचा उपयोग खालील विविध क्षेत्रांना होईल.

01. नियोजनबध्द विकासासाठी कृषी प्रक्रीया उद्योगांना उपयोगी
02. कृषी प्रक्रीया उद्योगांमध्ये नविन उतरण्याऱ्या उद्योजकांना उपयोगी
03. कृषी प्रक्रीया उद्योगातील उत्पादन सामान्य जनतेला माहितीसाठी उपयोगी
04. कृषी प्रक्रीया उद्यागासंबंधीचे संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना या अभ्यासाचा लाभ होईल.

❁ प्रकरण योजना (Chapteraisation) :-

संशोधकाने संशोधन अभ्यासाचे विवेचन खालील प्रकरणाच्या माध्यमातून केलेले आहे.

01. प्रस्तावना
02. दालमिल व तेलगिरणी उद्योगासंबंधी साहित्याचे अवलोकन, संशोधन पध्दती.
03. सामग्रीचे संकलन.
04. नांदेड जिल्हयाच्या विकासात दालमिल व तेल गिरणी उद्योगांची भुमिका.
05. दलमिल व तेल गिरणी उद्योगांतील समस्या व उपाययोजना.
06. सारांश शिफारशी.

संदर्भसूची (Bibliography) :-

01. कानवडे व्हि. आर. 1987, " प्रोसेसिंग ऑफ ऑईल सिड्स "

02. चव्हाण व्हि. एस. 1996, " व्हेजीटेबल प्रोडक्शन इन इंडिया," रामप्रसाद ॲड सन्स हॉस्पीटल, आग्रा - 03.

03. जॉन ए. ए. 1989, " अग्रीकल्चरल मार्केटिंग स्ट्रेटेजी प्रॅक्टीस," क्लीफ प्रेस, न्यु जर्सी.

04. डॉ. प्रभाकर देशमुख 2002, " उद्योजकता विकास संकल्पना," व्यवहार, पिंपळापूरे ॲड कंपनी पब्लिकेशन, नागपूर.

05. डॉ. वर्षा ऐनापुरे 2014, " ॲडव्हांस कॉस्ट अकाऊंटींग," मनान प्रकाशन, मुंबई.

06. प्रा. चोपडे, प्रा. चौधरी 2015, " ॲडव्हांस कॉस्ट अकाऊंटींग," सेठ प्रकाशन, मुंबई.

07. डॉ. श्री बी. कडवेकर, प्रा. रविंद्र कोठावरे इ. स. 2006, " व्यावसायीक उद्योजगता," डायमंड पब्लिकेशन, पुणे 30.

08. महाता टि. एल. 1986, " टेकनालॉजी ॲड रिफायनरींग ऑफ ऑईल ॲन्ड फॅटस," पेपर प्रेझेटेंशन, पुणे.

संशोधक

श्री चमकुरे शंकर खुशालराव

एम.कॉम.व जि.डी.सी.ॲन्ड ए

मार्गदर्शक

डॉ. पी.टी. पवार

(एम.कॉम., एम.फील.,पी.एच.डी.)

वाणिज्य विभाग

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर

जि. लातूर